माहिती हवीय?

सौ. सुधा अशोक कोर्टीकर, पंढरपूर.

□ आतापर्यंत कोणकोणत्या विश्वसुंदरी हिंदी चित्रपटात आल्या? त्यातील सर्वात अधिक यशस्वी विश्वसुंदरी कोण?

– पर्सिस खंबाटा, ऐश्वर्या राय, सुस्मिता सेन. यापैकी सर्वाधिक यश मिळवणारी विश्वसुंदरी म्हणजे ऐश्वर्या राय.

□ 'जान' या शब्दाने सुरू होणारे हिंदी चित्रपट कोणकोणते?

– *जान, जान हाजीर है, जान हथेली पे, जान की बाजी, जान की कसम, जान लडा देंगे, जान निस्सार, जान पहचान, जान पर खेल कर, जान से प्यारा, जान तेरे नाम, जान ए बहार, जान ए जिगर, जान ए वफा, जानम, जानबाज, जानदार, जानेमन.*

अशोक वा. कोर्टीकर, पंढरपूर.

□ सुभाष घई यांनी निर्माण केलेले चित्रपट कोणकोणते?

– *हीरो, कर्मा, राम लखन, खलनायक, सौदागर, परदेस, ताल, राहुल.*

□ *नगिना*साठी श्रीदेवीचे डोळे कोणते तंत्र वापरून बदलले गेले?

– कॉन्टॅक्ट लेन्स वापरून.

करिश्मा रामा भगत, कोळीवाडा.

□ पद्मिनी कोल्हापुरेला कोणत्या चित्रपटासाठी पारितोषिक मिळाले?

– १९८३ साली पद्मिनी कोल्हापुरेला *प्रेमरोग* या चित्रपटातील भूमिकेसाठी सर्वश्रेष्ठ अभिनेत्रीचे फिल्मफेअर पारितोषिक मिळाले होते.

□ मधुबालाचा पहिला चित्रपट कोणता? संगीतकार कोण?

– १९४२चा *बसंत* मधुबालाचा पहिला चित्रपट. या चित्रपटात ती बालतारका होती. पन्नालाल घोष या चित्रपटाचे संगीतकार होते. पण त्यांचं नाव पुढे करून अनिल विश्वासनी या चित्रपटाचं संगीत दिग्दर्शन केलं होतं. १९४७ चा *नीलकमल* मधुबालाने नायिकेची भूमिका केलेला पहिला चित्रपट. स्नेहल भाटकर या चित्रपटाचे संगीतकार होते.

कुमार हार्दिक रमेश शेलार,
आपटा कोळीवाडा.

□ राकेश रोशनने दिग्दर्शित केलेले चित्रपट कोणकोणते?

– *खुदगर्ज, खून भरी मांग, खेल, कोयला, कहो ना प्यार है.*

रामराव पवार, पुणे.

□ राजा गोसावी व शरद तळवलकर यांनी कोणकोणत्या चित्रपटात एकत्र भूमिका केली?

– *अखेर जमलं, लाखाची गोष्ट, दोन घडीचा डाव, याला जीवन ऐसे नाव, अवघाची संसार, जगाच्या पाठीवर, संगत जडली तुझी न माझी, आधी कळस मग पाया, बाप माझा ब्रह्मचारी, प्रीतिविवाह, सोनियाची पाऊले, वरदक्षिणा, वाट चुकलेले नवरे, कामापुरता मामा, सुधारलेल्या बायका, अतिशहाणा त्याचा, शेरास सव्वाशेर, श्रीमंत मेहुणा पाहिजे.*

कृष्णा अंबाजी कोळी, वरेडी.

□ बॉबी देओलचा पहिला चित्रपट कोणता?



ट्विंकल खन्ना आणि बॉबी देओल *बरसात*मध्ये

– *धरमवीर*. या चित्रपटात त्याने बालकलाकार म्हणून छोट्या धर्मेंद्रची भूमिका केली होती. त्याने नायकाची भूमिका केलेला पहिला चित्रपट *बरसात*.

□ राजा परांजपे यांनी दिग्दर्शित केलेला पहिला व शेवटचा चित्रपट कोणता?

– पहिला चित्रपट *बलिदान*, शेवटचा चित्रपट *आधार*.

अशोक पाटील, कोल्हापूर.

□ अमिताभ बच्चन, माला सिन्हा, वहिदाबरोबर कोणकोणत्या चित्रपटात नायकाच्या भूमिकेत चमकला?

– *संजोग*मध्ये माला सिन्हाबरोबर. *कभी कभी, परवरिश, अदालत* या चित्रपटात वहिदाबरोबर.

नितू यशवंत कोळी, अंतोरा पेण.

□ गोविंदा-करिश्मा कपूर या जोडीचे हिट चित्रपट?

– *दुलारा, खुद्दार, राजाबाबू, कुली नं. १, साजन चले ससुराल, हिरो नं. १.*

□ भारतीय चित्रपटातील पहिला संगीतकार कोण?

– फिरोज शहा मिस्त्री व बी. ईरानी. १९३१चा *आलमआरा* हा भारताचा पहिला बोलपट त्या दोघांनी संगीतबद्ध केला होता.

□ भारतीय चित्रपटातील नायक-नायिकेची पहिली जोडी कोणती?

– दाबके व साळुंखे. १९१३ चा *राजा हरिश्चंद्र* भारतात निर्माण झालेला पहिला मूकपट. दाबकेनी या चित्रपटात हरिश्चंद्राची भूमिका केली होती. त्या काळात स्त्रिया चित्रपटात भूमिका करीत नव्हत्या. यामुळे साळुंखेनी या चित्रपटात तारामतीची भूमिका केली होती.

चंचला चंद्रकांत कोळी, वरेडी कोळीवाडा.

□ ऊर्मिला मातोंडकर व आमिर खानचा पहिला चित्रपट कोणता?

– दोघेही बालकलाकार म्हणून चित्रपटात आले. ऊर्मिलाचा पहिला चित्रपट *संसार*. आमिरचा पहिला चित्रपट *यादों की बारात*.

आदिमाया शक्ती तांडेल, वरेडी.

□ अनिल कपूरचा पहिला सुपरहिट चित्रपट कोणता?

– *मिस्टर इंडिया.*

□ गोविंदा व करिश्मा कपूर या जोडीचा पहिला हिट चित्रपट कोणता?

– *खुद्दार.*

□ अक्षयकुमारचे 'खिलाडी' हा शब्द असलेले किती चित्रपट पडद्यावर आले?

– *खिलाडी, मैं खिलाडी तू अनाडी, सबसे बडा खिलाडी, खिलाडीयों का खिलाडी, मिस्टर ॲण्ड मिसेस खिलाडी.*

मेहुल प्रताप, पापडी वसई.

□ श्यामसुंदर व पं. गोविंदराम यांनी कोणकोणते चित्रपट संगीतबद्ध केले?

– *जंगी जवानी, नई कहानी, भाई, गावा की गोरी, भाई जान, देवकन्या, उर्वशी, आरसी, एक रात, एक्ट्रेस, बाजार, चार दिन, लाहोर, भाई बहन, कमल के फूल, निर्दोष, काले बादल, ढोलक, अलिफ लैला* हे श्यामसुंदर यांनी संगीतबद्ध केलेले प्रमुख चित्रपट.

जीवन ज्योती, हिम्मत, आबरू, पगली, सलमा, चालीस चोर, लैला मजनू, रत्नावली, ससी पन्नू, दो दिल, दुसरी शादी, राजमुकुट, शादी की रात, जीवननौका, नकाब हे पं. गोविंदराम यांनी संगीतबद्ध केलेले प्रमुख चित्रपट.

प्रसाद, प्रतिक, रमेश सावंत,
आपटा कोळीवाडा.

□ जितेंद्रने डबल रोल केलेले चित्रपट कोणकोणते?

– *जिगरी दोस्त, जैसे को तैसा, जस्टिस चौधरी, सरफरोश.*